केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश >> पान 2

शिर्डी साई मंदिरात गणेश उत्सवाची भक्तिमय सुरुवात >> पान 3

शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांचा क्रांतिकारी राजा! >> पान 4



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 37 ■ गुरुवार, दि. 28 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करा.



**प्रभासची फिल्मी आई लग्नाआधीच गर्भवती राहिली, गर्भपातासाठी प्रियकराकडून घेतले होते इतके पैसे!**

आतील पान

# संपूर्ण महाराष्ट्रात बाप्पाचे थाटामाटात आगमन

**मुंबई/विशेष प्रतिनिधी:** संपूर्ण महाराष्ट्रात गणेश चतुर्थीच्या निमित्ताने गणपती बाप्पाचे आगमन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावातं झाले. अकरा दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सुरुवात आज घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींच्या प्रतिष्ठापनेने झाली. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या सजावटीत आणि पारंपरिक वेशभूषेत बाप्पाचे स्वागत करताना संपूर्ण राज्य भक्तिमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.




राज्यातील प्रमुख शहरांमध्ये सार्वजनिक गणेश मंडळांनी जय्यत तयारी केली असून, विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील लालबागचा राजा, पुण्याचा श्रीमन मंडई गणपती, नागपूरचा झंडा चौक गणपती, कोल्हापूरचा अंबाबाई गणपती, नाशिक व छत्रपती संभाजी नगर येथील मंडळांमध्ये आकर्षक देखावे साकारण्यात आले आहेत.

यावर्षी अनेक मंडळांनी पर्यावरणपूरक गणपती आणि पारंपरिक वेशभूषेवर भर दिला आहे. घरगुती गणपतींसाठी शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंग व घरच्या घरी विसर्जनाची तयारी केली गेली आहे. शासन आणि स्थानिक प्रशासनानेही पर्यावरणपूरक उत्सवासाठी विविध जनजागृती उपक्रम राबवले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. पोलिस, होमगार्ड, ड्रोन व सीसीटीव्हीच्या मदतीने सर्वत्र लक्ष ठेवले जात आहे. गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन वैद्यकीय सेवा आणि नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत.

गणेशोत्सवाच्या अकरा दिवसांत धार्मिक पूजा, भजन-कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्य शिबिरे, स्पर्धा, सामाजिक उपक्रम आदींचे आयोजन करण्यात आले असून, बाप्पाच्या उत्सवात राज्य एकजुटीने सहभागी झाले आहे. या पर्वकाळात भक्तांचा उत्साह, श्रद्धा आणि सांस्कृतिक ऐक्य याचे दर्शन घडणार आहे.

# उद्धव ठाकरे यांची शिवतीर्थवर भेट, राज ठाकरे यांच्यासह सहकुटुंब गणेश दर्शन





**मुंबई/प्रतिनिधी:** गणेशोत्सवाच्या निमित्ताने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या निवासस्थानी 'शिवतीर्थ' येथे भेट देऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. या ऐतिहासिक भेटीने दोन्ही ठाकरे बंधूंमधील संबंधांमध्ये नव्याने जिव्हाळा निर्माण झाल्याचे संकेत मिळत आहेत.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत पत्नी रश्मी ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरेही उपस्थित होते. राज ठाकरे यांनी स्वतः उद्धव ठाकरे यांना आमंत्रण दिले होते, ज्याला मान देत ठाकरे कुटुंबाने 'शिवतीर्थ' येथे उपस्थिती लावली.

शिवतीर्थवर दाखल झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी गणपतीचे दर्शन घेतले आणि त्यानंतर दोन्ही कुटुंबीयांनी स्नेहभोजनात सहभाग घेतला. जवळपास दोन दशके दूर राहिलेल्या ठाकरे बंधूंच्या या भेटीला सामाजिक, कौटुंबिक आणि राजकीय अशा सर्वच स्तरांवर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.


या भेटीबाबत विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, ''श्रीगणेशाने दोघांनाही सुबुद्धी दिली, म्हणून आज ते एकत्र आले,'' अशी प्रतिक्रिया दिली.

गेल्या महिन्यात राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी जाऊन त्यांचा वाढदिवस साजरा केला होता. त्या भेटीनंतर आता शिवतीर्थवरील गणपती दर्शनाने दोघांमधील संबंध अधिक दृढ होत असल्याचे संकेत मिळत आहेत. आगामी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या घडामोडीकडे राजकीय वर्तुळात विशेष लक्ष केंद्रित झाले आहे.

### गणपती दर्शनाच्या निमित्ताने महत्त्वपूर्ण भेट

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या घरी मुख्यमंत्री फडणवीसांची उपस्थिती





**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईत आज एक राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण क्षण पाहायला मिळाला, जेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या निवासस्थानी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. निमित्त होतं गणपती बाप्पाचं दर्शन पण उपस्थितीमुळे अनेक राजकीय चर्चांना उधाण आलं आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत श्रद्धेने बाप्पाचं दर्शन घेतलं आणि सर्वांच्या सुख, समृद्धी आणि विघ्नविनाशासाठी प्रार्थना केली. ''तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता'' या ओळींनी त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत भक्तीभावाने गणरायाला नमन केलं.

# मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना

### आझाद मैदानावर आंदोलनासाठी पोलिसांची परवानगी; जरांगेंचेही स्वत:च्या सहीने पोलिसांना हमीपत्र

**जालना /प्रतिनिधी:** मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून सगेसोयऱ्यांचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली आज (बुधवारी) मराठा आंदोलक अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. जुन्नर, राजगुरु नगर, खेड, चाकण, तळेगाव, लोणावळा, पनवेल, वाशी आणि चेंबूर असा प्रवास करत हा मराठा मोर्चा २८ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानात पोहोचणार आहे. मुंबई दौऱ्यावर जाताना मनोज जरांगे यांची त्यांच्या परिवारासोबत भेट झाली. यावेळी मनोज जरांगेंसह पत्नी आणि मुलीला अश्रू अनावर झाले. अंकुशनगर येथील मनोज जरांगे यांच्या



घराजवळ परिवाराकडून त्यांचं औक्षण करण्यात आलं. यावेळी जमलेल्या महिलांनाही अश्रू अनावर झाले.

मुंबई दौऱ्यावर जाताना मनोज जरांगे यांनी प्रवासा दरम्यान अंकुशनगर येथे आपल्या परिवाराची भेट घेतली, यावेळी त्यांच्या पत्नी सौमित्रा जरांगे यांनी औक्षण केलं, याप्रसंगी मनोज जरांगे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी आणि मुला मुलीला अश्रू अनावर झाल्याचं दिसून आलं. यावेळी जरांगे यांनी आपल्या मुलीची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर जमलेले इतर महिलांनी देखील जरांगेंच औक्षण केलं. यावेळी सर्वजण भावूक झाल्याचं दिसून आलं.

मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीतून मुंबईला >> पान ३

# शेतकऱ्यांची हाक... बुलडाणा जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा!

## आमदार सिद्धार्थ खरात यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

### फक्त पंचनामे नाहीत, आता निर्णय हवा! आमदार सिद्धार्थ खरात यांचा सरकारला इशारा

**शेतीत दरवर्षी मेहनतीनं आशा पेरणारा शेतकरी, यंदा आभाळाच्या कोपाने होरपळून निघाला आहे. मेहकर व लोणारसारख्या तालुक्यांत अतिवृष्टीमुळे फक्त पिकांचं नाही, तर स्वप्नांचंही नुकसान झालं. कधी पावसाची उणीव, तर कधी अती पण दर वेळी शेतकऱ्याच्या ताटात मात्र रिकामी भाकरीच पडते. या पार्श्वभूमीवर, शासनाने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला न्याय द्यावा, ही काळाची गरज आहे.**

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/कार्यालय प्रतिनिधी:** आभाळाने अवकृपा केली, तर मातीत जपलेली स्वप्नं वाहून जातात. यंदाचा खरीप हंगाम बुलडाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दुःख, नुकसान आणि हताशतेची कहाणी घेऊन आला. मेहकर व लोणार तालुक्यांत झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे हजारो एकर शेतीचे नुकसान झाले असून, या संकटग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ओला दुष्काळ जाहीर करण्याची ठाम मागणी केली.

आमदार खरात यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, जून महिन्याच्या अखेरीस अवघ्या २ दिवसांत २१२ मि.मी. पाऊस कोसळला. मेहकर आणि लोणार तालुक्यांतील १६ मंडळांत ढगफुटी सदृश अतिवृष्टी झाली. त्या पावसात उभं पीक खरडून गेलं... शेतात पाणीच पाणी... आणि शेतकऱ्यांच्या आशा मातीतच मिसळल्या. मूग, भुईमूग, हळद आणि इतर पिकांची मुळे कुजली, पिकं पिवळी पडली आणि हातात काहीच उरलं नाही.

एकदाचा पाऊस थांबतोय का, हीच आशा असतानाच २२ जुलै रोजी पुन्हा एकदा ढगफुटीने शेतकऱ्यांच्या जखमा नव्याने उघडल्या. आणि त्यावरही पुरेसे नव्हते, म्हणून १७ ते २० ऑगस्ट दरम्यान पुन्हा अतिवृष्टी झाली. या नैसर्गिक आपत्तींनी शेतकऱ्यांच्या संपूर्ण मेहनतीला सुरुंग लावला.



या पार्श्वभूमीवर, आमदार सिद्धार्थ खरात यांनी मागणी केली की, बुलडाणा जिल्ह्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा, शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रु. ५०,००० (प्रति एकर २०,०००) इतके नुकसानभरपाई अनुदान मिळावे, तसेच इतर सरकारी सवलती व मदतींचा लाभ तातडीने मिळावा.

आज, या मातीत खस्ता खात उभा असलेला शेतकरी फक्त मदतीची वाट पाहतोय. सरकारने त्याच्या अश्रूंना उत्तर द्यावे, हीच अपेक्षा आहे.

### शेतीत पेरतो आशा, आभाळाने वाहून नेली तीही...

दरवर्षी नव्याने पेरतो स्वप्नं, मेहनतीने मातीत रुजवतो विश्वास. पण आभाळच रुसलेलं... कधी पावसाचं नाव नाही, तर कधी त्याचं रौद्र रूप. ''कधी पावसाची कमतरता, कधी अती... पण शेतकऱ्याच्या ताटात मात्र रिकामीच भाकरी.'' घरात मुलांचे प्रश्न अन उत्तरं मात्र शासनाच्या फाइलांमध्ये अडकलेली. शेतकरी फक्त माती नाही, तो देशाचं पोट भरणारा देव आहे पण त्याच्याच ताटात रोज नशिबाची उपाशी पाटी असते. स्वप्नं पिकवणाऱ्या हातांमध्ये आज हतबलता आहे... पण तरीही तो पुन्हा नांगर घेतो, कारण त्याला थांबणं माहीत नाही.

## कसोटी क्रिकेटचा आधारस्तंभ

भारतीय कसोटी क्रिकेट संघाचा आधारस्तंभ असणारा भारताचा अनुभवी कसोटीवर चेतेश्वर पुजारा याने कसोटीसह सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून नुकतीच निवृत्ती घेतली. त्याच्या निवृत्तीने कसोटी क्रिकेटमध्ये एक तपाहून अधिक काळ अभ्येद असणारी भारताची भिंत ढासळली. त्याची निवृत्ती क्रिकेटप्रेमींना चटका लावून जाणारी ठरली कारण चेतेश्वर पुजारा हा कसोटी क्रिकेटचा खराखुरा आणि कदाचित शेवटचा राजदूत असेल. १५ वर्षापूर्वी म्हणजे २०१० साली जेंव्हा त्याने कसोटी संघात प्रवेश केला तेंव्हाच त्याने दाखवून दिले की कसोटी क्रिकेटमध्ये यशस्वी होण्यासाठी लागणारे तंत्र त्याच्याकडे आहे. राहुल द्रविड हा कसोटी क्रिकेटमधील सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज. चेतेश्वर पुजारा हा देखील तसाच तंत्रशुद्ध फलंदाज. राहुल द्रविडप्रमाणेच त्याचाही बचाव भक्कम. बाद न होण्याची खबरदारी घेत खेळत राहण्याची त्याची शैली राहुल द्रविडसारखीच होती म्हणूनच त्याला द्रविडचा वारसदार म्हंटले जाऊ लागले त्यानेही त्याला दिलेली ही उपाधी सार्थ ठरवली. राहुल द्रविड प्रमाणेच तो ही तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस येऊ लागला. सुरुवातीचे फलंदाज लवकर बाद झाल्यावर एक बाजू लावून धरत संघाचा धावफलक वाढवत नेण्याची जबाबदारी तो पार पाडत असे. बाद न होता गोलंदाजांना थकवण्याची त्याची कला कसोटीतील खूप थोड्या फलंदाजांकडे होती. पुजारा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करायला आला की एक बाजू भक्कम व्हायची. तो नांगर टाकून फलंदाजी करत असल्याने इतर फलंदाज खोऱ्याने धावा काढत असे. त्यामुळे त्याकाळात भारताची मधली फळी ही जगातील सर्वोत्तम मधली फळी मानली जात होती. तो संघात असताना भारताने अनेक अविश्वसनीय विजय मिळवले. या विजयात त्याचा मोलाचा वाटा होता. पुजाराने काढलेल्या १९ शतकांपैकी १३ शतकांच्या वेळी भारताचा विजय झाला. त्याने केलेल्या ६० टक्के धावा भारत जिंकलेल्या कसोट्यांमधील आहेत. विराट कोहली ५८, राहुल द्रविड ३९, तेंडुलकर ३८ यांच्यापेक्षाही ही टक्केवारी अधिक आहे. पुजाराने खेळलेल्या १०३ कसोटीत ४४ च्या सरासरीने ७१९५ धावा धावा काढल्या. या धावा काढताना त्याने १९ शतके आणि ३५ अर्धशतके झळकावली. त्याची ही आकडेवारी पाहून टी २० चे समर्थक त्याला महान फलंदाजांच्या पंगतीत बसवणार नाही हे मान्य. त्याची ही आकडेवारी त्याची ओळख करून देण्यास पुरेशी नाही हे ही मान्य पण या धावा काढताना त्याने दाखवलेला संयम आणि त्याने दाखवलेली हिंमत ही त्याला निश्चितच महान फलंदाजांच्या पंगतीत बसवेल. आक्रमणास प्रतिआक्रमणाने उत्तर देण्याऐवजी त्यांचा आत्मविश्वास खच्ची करण्यावर त्याचा भर असे. तो बाद होत नाही हे पाहून वैतागलेले वेगवान गोलंदाज त्याला इजा पोहचेल अशी गोलंदाजी टाकत. वेगवान गोलंदाजांचा मार खाल्यावरही तो डगमगत नसे. प्रत्येक चेंडू, प्रत्येक षटक आणि प्रत्येक सत्राचा विचार करून तो खेळत असे. २०१८ साली भारताने पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात कसोटी मालिका जिंकली त्यात त्याचे योगदान मोलाचे होते. त्यात त्याने ५०० हून अधिक धावा केल्या. विशेष म्हणजे या धावा काढताना त्याने १२०० पेक्षा अधिक चेंडूचा सामना केला. या मालिकेत त्याला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले होते. २०१७ मध्ये त्याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच एका कसोटीत ५२५ चेंडूचा सामना केला ही भारतीय कसोटी इतिहासातील ऐतिहासिक घटना ठरली. देशासाठी सर्वकाही पणाला लावणारा पुजारा सारखा खेळाडू भारतीय क्रिकेटला लाभला हे भारतीय क्रिकेटचे भाग्यच. पुजारा म्हणजे विश्वास आणि समर्पणाचे दुसरे नाव. तो जरी निवृत्त झाला असला तरी कसोटी क्रिकेटमध्ये त्याने दिलेले योगदान क्रिकेटप्रेमी कधीही विसरू शकणार नाही. निवृत्तीनंतर तो समालोचक किंवा प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसेल. भारतीय कसोटी क्रिकेटचा आधारस्तंभ राहिलेल्या चेतेश्वर पुजाराला पुढील कारकिर्दीसाठी मनापासून शुभेच्छा!

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

## जिल्ह्यात नविन ४२ बी.एस.एन.एल. चे टॉवर सेवेत कार्यान्वीत

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी:** ग्रामीण भागातही बी.एस.एन.एल. ची मोबाईल आणि इंटरनेट सेवा ग्राहकांना उत्तमरीत्या मिळावी या दृष्टिकोनातून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मागणी केलेले नविन ४२ टॉवरची सेवा कार्यन्वीत झाली आहे. त्यामुळे नागरीकांना बीएसएनएलची नेटवर्क सेवा चांगल्या दर्जाची मिळणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात भारतीय दूरसंचार निगम अर्थात बी.एस.एन.एल. ची सेवा मिळत नाही. अशा तक्रारी ग्रामीण भागातून केंद्रीयमंत्री तथा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या यासंदर्भात दूरसंचार विभागाशी पत्र व्यवहार करून सूचित करण्यात आले होते. बी.एस.एन.एल. ची इंटरनेट व मोबाईल सेवा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून नवीन टॉवर उभारण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार नवीन टॉवरचा प्रस्ताव तयार करून तो संबंधित विभागाला पाठवल्यानंतर त्याचा पाठपुरावा खासदार प्रतापराव जाधव यांच्या कार्यालयाच्या वतीने करण्यात आला होता.

त्याच्या पाठपुराव्याला यश आले असून बुलढाणा जिल्ह्यात आता नव्याने ४४ टॉवर ग्रामीण भागामध्ये उभारल्या गेले आहे. त्यापैकी ४२ टॉवरवरून आजपासून सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातही आता बी.एस.एन.एल.ची चांगल्या दर्जाची सेवा ग्राहकांना मिळणार आहे. यामध्ये बुलढाणा तालुक्यातील अटकळ मातला बोरखेड चिखली तालुक्यातील, बोराळा, मेडशिंग या टॉवरचे काम प्रगतीपथावर तर घुमा, भोरसा भोरसी, टावर वरून सेवा कार्यान्वित दहिगांव, पिंपरखेड मेहकर तालुक्यातील वाघदेव, मेळजानोरी, मुंदेफळ, मादणी मोताळा तालुक्यातील चिंचपुर, हनवतखेड, खडकी, खंडवा, नळकुंड लोणार तालुक्यातील कासारी, सिंदखेड राजा तालुक्यातील गुंज, आडगांव राजा, खामगांव तालुक्यातील पिंप्री कोरडे, वडजी, श्रीधर नगर, नागझरी खु., नांद्री, कदमापुर, शेगांव तालुक्यातील घुई हिंगणा, जळगांव जामोद तालुक्यातील काजेगांव, दादुलगांव, मांडवा, सोनबर्डी, गारपेठ, करमोडा संग्रामपुर तालुक्यातील रोहीण खिडकी नविन, आवार, वडगांव, आसवंत, मलकापुर तालुक्यातील अनुराबाद, हरसोडा, नांदुरा तालुक्यातील वळती, काटी, गोशिंग येथे बी.एस.एन.एल. चे टॉवर उभारल्या गेले आहेत या टावर वरून सेवाही कार्यान्वित करण्यात आली आहे. या टॉवरमुळे इंटरनेट आणि मोबाईलची बी.एस.एन.एल. सेवा सुधारून नेटवर्कही ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.

### दूरसंचारमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मानले आभार

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागात बी.एस.एन.एल. ची सेवा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून नवीन टॉवरची मागणी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत बुलढाणा जिल्ह्यात नवीन ४४ टॉवर मंजूर करून त्यातील ४२ टॉवर वरून तत्पर सेवा कार्यान्वित करून दिल्याबद्दल नामदार प्रतापराव जाधव यांनी आभार मानले.




# जिल्हा मध्यवर्ती बँकेत गणपतीची स्थापना



**नांदेड/प्रतिनिधी:** नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत गणेश चतुर्थीच्या दिवशी आज नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर यांच्या हस्ते विधिवत पूजा करून गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी मंडळ अध्यक्ष प्रकाश पवार, डॉ. अजय कदम, सरव्यवस्थापक एम. शिंदे, जी. एस. पाटील, पी. व्ही. गुडे, के. बी. पाटील, एस. एस. सोंळके, एस. के. नरवाडे यांच्या सह बँकेतील कर्मचारी उपस्थित होते.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या फोननंतर फक्त ५ तासातच नरेंद्र मोदींनी युद्ध थांबवलं, राहुल गांधींचा गंभीर आरोप

मुझफ्फरपूर : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पंतप्रधान मोदींनी पाकिस्तान विरोधात सुरु असलेली दहशतवादी छावण्यांवरील भारताची कारवाई तात्काळ थांबवली होती. त्यांनी हे सर्व अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सूचनेवरुन केल्याचे राहुल गांधी म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांनी २४ तासात पाकिस्तानविरोधात सुरु असलेली कारवाई थांबवण्याचे सांगितले होते, मात्र, नरेंद्र मोदींनी २४ तासांत नाही तर ५ तासांत सर्व काही थांबवल्याचा आरोप राहुल गांधींनी केला आहे.

बुधवारी बिहारमधील मुझफ्फरपूर येथे 'मतदार हक्क यात्रा' रॅलीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, मोदींनी पाकिस्तानमधील दहशतवादी छावण्यांवरील भारताची कारवाई तात्काळ थांबवली होती आणि हे सर्व अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सूचनेवरून घडले होते.

जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध सुरू होते, तेव्हा ट्रम्प यांनी नरेंद्र मोदींना फोन केला होता. त्यांना जे काही सुरु आहे ते २४ तासात थांबवा. यानंतर नरेंद्र मोदींनी २४ तासांत नाहीतर फक्त ५ तासातच सर्व काही थांबवल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

## एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा रद्द, संघर्षयोद्ध्याशी सरकार पुन्हा चर्चा करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चांगलाच पेटला असून मनोज जरांगे पाटील यांनी आज अंतरवली सराटी येथून मुंबईकडे कूच केली आहे. सणासुदीच्या काळात आंदोलन टाळावे, सरकारसोबत चर्चा करावी, अशी विनंती सरकारकडून करण्यात आली. मात्र, जरांगे पाटील आपल्या मागण्यांवर ठाम असून, आंदोलनाची दिशा आता थेट मुंबईकडे वळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या या निर्णयाला सत्तेतील आणि विरोधी पक्षातील काही आमदार, खासदारांनी पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे सरकारची देखील कोंडी झाल्याची चर्चा आहे.

अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा अचानक रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे हे गणेशत्सवासाठी दरवर्षी दरे या आपल्या मूळगावी जात असतात. मात्र हा दौरा रद्द होण्यामागील नेमकं कारण काय हे अद्याप कळू शकलेलं नाही. परिणामी नियोजित असलेला दौरा अचानक रद्द झाल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा अचानक रद्द झाल्याने या बाबत मनोज जरांगे यांचे सुरु असलेलं आंदोलन देखील कारणीभूत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगेंशी सरकार पुन्हा चर्चा करणार का? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. तर मराठा आरक्षणासाठी जरांगेंनी देवेंद्र फडणवीसांना टार्गेट केलं असताना शिंदेंनी आजपर्यंत त्यावर मौन बाळगल्याचं दिसून येतंय. मुख्यमंत्री असताना जरांगेंची आंदोलनं हाताळण्याचा अनुभव असताना शिंदे आता गप्प का आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# नागपूरसह अमरावती विभागातील नझुल जमिनींच्या विशेष अभय योजनेला मुदतवाढ

## राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** नागपूर आणि अमरावती विभागातील निवासी वापरासाठी दिलेल्या नझुल जमिनींसाठीच्या विशेष अभय योजनेला आणखी एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. दरम्यान, नागपूर आणि अमरावती विभागातील भाडेतत्वावर दिलेल्या नझुल जमिनी संदर्भातील मुद्यांबाबत सर्वकष अभ्यास करुन विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने शासनास अहवाल सादर केला आहे.

त्यानुसार विशेष अभय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेस मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येत होती. ज्या भाडेपट्टेदारांना या योजनेमध्ये आतापर्यंत विविध कारणांसाठी भाग घेता आला नाही, अशा सर्व भाडेपट्टेदाराना या योजनेत सहभागी होण्याची संधी प्राप्त व्हावी, यासाठी या योजनेस एक वर्ष मुदतवाढ देण्यात येत आहे.

दरम्यान, या विशेष अभय योजनेस १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. ही योजना ज्या नझुल जमिनी निवासी वापरासाठी लिलावाद्वारे-प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या आहेत, त्यांनाच लागू राहील. विशेष अभय योजना समाप्तीनंतर १ ऑगस्ट २०२६ पासून शासन निर्णय दि. २३ डिसेंबर २०१५ आणि शासन निर्णय २ फेब्रुवारी २०१९ च्या तरतूदी लागू राहतील.

कोकणात वेंगुर्ल्याला गणेशोत्सवानिमित्त आम्ही शासन निर्णय जाहीर केला, गवळी कोड्याचा फ्रीहोल्ड झालेला आहे. तसेच नागपूर आणि अमरावती सरकारी जागेवर लोक राहतात त्यांना अजून जागेवर आहे ते कायदेशीर करण्याकरता नझुलच्या जागेवर बसलेल्या



घरांना त्याच्या जागेचे मालकी पट्टे देण्यासाठी एक वर्षाची मुदत वाढ दिली आहे. नागपूर आणि अमरावती विभागात सरकारी जागेवर अजून च्या जागेवर पट्टे असतील त्यांना पट्टे वाटप करणार, गणेशोत्सवाच्या दिवशी मुख्यमंत्री आणि सरकारने हा निर्णय घेतला आहे. अशी प्रतिक्रिया महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### आमदार रवींद्र फाटक यांच्या घरी गणरायाचे आगमन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी:** आमदार रवींद्र फाटक यांच्या घरी देखील गणरायाचे आगमन झाले. शुभकाशी फ ुलांची सजावट फाटक यांच्या घरी करण्यात आली आहे. सरकारने गणेशोत्सवाला विशेष दर्जा दिल्याने व गणेशोत्सव काळामध्ये भजन स्पर्धा आरास्य स्पर्धा अशा विविध स्पर्धा आयोजित केल्याने यावर्षी गणेशोत्सवाला भाविकांमध्ये मोठा उत्साह आहे. त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील चाकरमानी कोकणवासी यांना दोन दिवसापूर्वीच गणेशोत्सवाच्या आधी मोफत एसटी बस उपलब्ध करून देऊन गावी जाण्यास मदत केल्याने त्यांचे देखील आभार यावेळी रवींद्र फाटक यांनी मानले असून, आम्ही आमच्या घरचा गणपती हा घरातच विसर्जन करतो. कारण आमचे मूर्ती शाडू मातीचे असते. त्यामुळे आम्ही स्वतःपासूनच पर्यावरणाचे रक्षण करण्याची सुरुवात करतो. नागरिकांना संदेश देणे सोपे वाटते, असे मत रवींद्र फाटक यांनी व्यक्त केले.

### ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळावे - बाळासाहेब थोरात



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** यावर्षी राज्यात चांगला पाऊस झाला आहे. मात्र काही भागांमध्ये कमी पाऊस आहे. सर्व भागांमध्ये चांगला पाऊस होऊन राज्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी सुखी होऊ दे अशी प्रार्थना करताना मराठा समाजाच्या मागणीसाठी सुरू झालेले मनोज जरांगे यांचे आंदोलन यशस्वी होऊन ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा आरक्षण मिळू दे अशी प्रार्थना काँग्रेसच्या राष्ट्रीय कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांनी गणेश चरणी केली आहे.

### डिजिटल अरेस्ट करुन वृद्धाची आणि महिलेची २१ लाखांची फसवणूक



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी:** पोलीस असल्याची बतावणी करून मनी लाँडरिंगच्या गुन्ह्यात गोवण्याची धमकी देऊन डिजिटल अरेस्ट केले. यातून सुटका होण्यासाठी वृद्धाकडून ८ लाख व महिलेची २१ लाख २५ हजार १६१ रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. यातील पहिली घटना शहरातील शांताबाई किल्लेदार नगरात तर दुसरी घटना शाहीर वस्ती परिसरात घडली. दोन्ही गुन्ह्यात सहा जणांविरुद्ध सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ऑनलाईन फसवणूकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. अनोळखी व्यक्तीचा फोन आल्यास वैयक्तिक माहिती शेअर करू नये. आपल्याच माहितीद्वारे फसवणूक होत आहे. तातडीने नजीकचे पोलिस ठाण्यात संपर्क साधावा. असे आवाहन सायबर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी केले आहे.

### जळगावात भाजपच्या माजी नगरसेवकावर धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला

**जळगाव/प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगावात भाजपच्या माजी नगरसेवकावर प्राण घातक हल्ला करण्यात आला आहे. माजी नगरसेवक प्रभाकर चौधरी यांच्यावर धारदार कोयत्याने वार करण्यात आले आहे. या हल्ल्यात प्रभाकर चौधरी यांना मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्याने ते गंभीर रित्या जखमी झाले आहे. त्यांना पुढील उपचारासाठी धुळे येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र हा हल्ला नेमका कुणी आणि कुठल्या कारणावरून करण्यात आलाय हे अद्याप कळू शकलेलं नाहीये. मात्र या घटनेने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

# शिर्डी साई मंदिरात गणेश उत्सवाची भक्तिमय सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** संपूर्ण देशभरात गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर आज घराघरांत, मंडळांमध्ये आणि देवस्थानांमध्ये गणपती बाप्पाचे स्वागत करण्यात येत आहे. अशातच शिर्डी येथील प्रसिद्ध साईबाबा मंदिरातही आज श्री गणेशाची प्रतिमा विधिवत पूजन करून बसवण्यात आली असून, गणेशोत्सवाची सुरुवात भक्तिमय वातावरणात करण्यात आली आहे.

साई संस्थानच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या पूजन सोहळ्याला शेकडो भाविकांनी उपस्थित राहून गणपती बाप्पाच्या दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी





शुभमुहूर्तावर श्री गणेशाची प्रतिमा साई मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या समोरच, साई प्रतिमेच्या पुढे ठेवण्यात आली. पूजन, अर्चन, मंत्रोच्चार आणि आरतीने मंदिर परिसर भक्तिमय झालेला होता.

**पूजनाची खास व्यवस्था**

साई संस्थानने यासाठी विशेष व्यवस्था केली होती. मंदिरात फुलांची आकर्षक सजावट, रांगोळ्या, आणि भक्तांसाठी दर्शनाची व्यवस्था सुरळीत ठेवण्यात आली. पूजेसाठी विशेष पुरोहितांना आमंत्रित करण्यात आले होते, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशाचे शास्त्रशुद्ध पूजन पार पडले.

**सामाजिक संदेशही**

यावर्षी साई संस्थानने गणेशोत्सवाला एक सामाजिक संदर्भ देण्याचा प्रयत्न केला आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना करून आणि प्लास्टिकमुक्त उत्सव साजरा करण्याचे आवाहन संस्थानने भाविकांना केले आहे. त्यास उत्स्फ ूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

**भाविकांचे आकर्षण**

शिर्डी हे आध्यात्मिक केंद्र असल्यामुळे येथे देशभरातून भाविक सतत येत असतात. गणेशोत्सवाच्या निमित्ताने भाविकांची संख्या आणखी वाढली असून, गणपती आणि साईबाबा दोघांचेही दर्शन घेण्याची संधी यामुळे मिळते आहे. मंदिर प्रशासनाने गर्दीच्या नियंत्रणासाठी अतिरिक्त स्वयंसेवक आणि सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

**नवस, भक्ती आणि श्रद्धेचा संगम**

आजच्या या दिवशी अनेक भाविकांनी नवस फेडण्यासाठी आणि मनोकामना पूर्ण होण्यासाठी गणपती बाप्पाला फळ, नारळ, दुर्वा व मोदकांचा नैवेद्य अर्पण केला. सकाळपासूनच साई मंदिरात ''गणपती बाप्पा मोरया'' च्या गजरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

शिर्डीमध्ये साजरा होणारा हा गणेशोत्सव साई भक्तांसाठी एक वेगळाच आनंददायी अनुभव बनला आहे. येत्या दहा दिवसांत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाची योजना करण्यात आली असून, संस्थानमार्फत दररोज विशेष पूजन, आरती आणि प्रवचनांचा कार्यक्रम होणार आहे.

पान एक वरून..

# मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना



निघण्यापूर्वी आझाद मैदानात दीर्घकाळ आमरण उपोषणाला बसावे लागेल, याची कल्पना मराठा आंदोलकांना दिली. ही आरपारची आणि शेवटची लढाई आहे. कितीही वेळ लागला तरी आपण मुंबई सोडायची नाही, असे मनोज जरांगे यांनी सांगितले. या पार्श्र्वभूमीवर मराठा आंदोलक तब्बल महिनाभर मुंबईत राहावे लागेल, अशी तयारी करुन घराबाहेर पडले आहेत. मनोज जरंगे यांनी आवाहन केल्यानंतर राज्यभरातील गाव गाड्यांमधून मराठा बांधव आरक्षणासाठी मुंबईकडे निघाले आहेत. परभणी जिल्ह्यातील प्रत्येक गावातून विविध गाड्यांच्या माध्यमातून मराठा समाजबांधव, युवक हे मुंबईकडे निघाले आहेत. दोन महिन्याचा किराणा, गॅस शेगडी, भगुने व इतर साहित्य घेऊन हे मराठा बांधव मुंबईकडे निघाले आहेत. जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मुंबई सोडणार नसल्याचा निर्धार या मराठा बांधवांनी केला आहे.

मराठा आरक्षणाचे केंद्रबिंदू राहिलेल्या बीड जिल्ह्यातून मनोज जरांगे पाटील यांना मुंबईतील आंदोलनासाठी पाठिंबा वाढतोय. मुंबईकडे जाण्यावर मनोज जरांगे ठाम आहेत. आणि त्यांच्यासोबत जाण्यासाठी बीडमधून मोठ्या संख्येने मराठा समाज अंतरवली सराटीत दाखल झाले. ट्रकच्या ट्रक भरून मराठा समाजातील सदस्य पंधरा दिवसांची शिदोरी घेऊन मुंबईकडे निघाले आहेत. एक ना अनेक ट्रक अशा स्वरूपात अंतरवली सराटीवरुन मुंबईला निघाले होते.

मनोज जरांगेंच्या आंदोलनाला केवळ एकाच दिवसाची परवानगी, मुंबई पोलिसांचं स्पष्टीकरण, अटी शर्तींचं उल्लंघन केल्यास करवाई होणार

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांची शर्त परवानगी दिली आहे. २९ तारखेला केवळ एकच दिवस सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिली आहे. त्यानंतर मात्र मोर्चे करांना मैदानात थांबता येणार नसल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे. आंदोलनकर्त्यांची वाहनांना फ्री-वे ने केवळ वडीबंदर जंक्शनपर्यंत येण्याची मुभा देण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केवळ जरांगे पाटील यांच्यासोबत असलेल्या पाच वाहनांना आझाद मैदानापर्यंत येण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच आझाद मैदानात ७ हजार स्क्वेअर मीटरचे क्षेत्र आंदोलनासाठी राखीव असल्याने मैदानाच्या क्षमतेनुसार केवळ ५००० आंदोलकांना मुंबई पोलिसांनी परवानगी दिली आहे.

आखून दिलेल्या मार्गातूनच मोर्चा काढणं बंधनकारक असल्याचे पोलिसांनी सांगितलं आहे. पूर्व परवानगीशिवाय ध्वनिक्षेपकांचा वापर करता येणार नाही. आझाद मैदानात अन्न शिजवण्यास पोलिसांनी मनाई केली असून आझाद मैदानाची स्वच्छता देखील आंदोलनकर्त्यांची जबाबदारी असल्याच मुंबई पोलिसांनी पत्रात स्पष्ट केले आहे. आंदोलनात लहान मुलं, गरोदर स्त्रिया तसेच वृद्धांना सहभागी न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मनोज जरांगे यांच्या आंदोलना विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेत प्रशासनाने घातलेल्या अटी शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. मुंबई पोलिसांनी आंदोलनाला परवानगी देताना मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशाची प्रत तसेच नियमावलीची प्रत देखिल सोबत जोडली आहे. अटी शर्तींचे उल्लंघन करत कायद्याचा भंग केल्यास आंदोलन बेकायदेशीर ठरवून कायदेशीर कारवाईचा इशारा देखील मुंबई पोलिसांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांना सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंतच आंदोलन करता येणार आहे. त्यानंतर त्यांना आझाद मैदानात थांबता येणार नाही. तसेच या मैदानाची क्षमता फक्त ५००० एवढीच आहे. तर जारांगे यांच्या समर्थनार्थ आझाद मैदानावर मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. ही शक्यता खरी ठरल्यास सायंकाळी सहा वाजल्यानंतर आझाद मैदानावरील गर्दीचे काय होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे आता सरकार या अडचणीवर कोणता तोडगा काढणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मराठा समाजाला शाश्वत असं ठोस आरक्षण द्या – सत्यजित तांबे



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी:** मनोज जरंगे यांचे आंदोलन आता निर्णय टप्प्यावरती आहे. अनेक सरकारे आली आणि गेली मात्र मराठा आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकत नाही. त्यामुळे आता मराठा समाजाला शाश्वत असं ठोस आरक्षण दिले गेले पाहिजे, असे नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी सरकारला आव्हान केले आहे.

आम्ही मराठा आरक्षणाच्या बाजूने आहोत ही खूप जुनी मागणी आहे. त्यामुळे ही मान्य झाली पाहिजे असे देखील सत्यजित तांबे यांनी सांगितले आहे.

## रील बनवा आणि जिंका १,00,000 रुपयांचे बक्षीस!

**पुणे/प्रतिनिधी:** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यावर्षी सांस्कृतिक कार्य विभागाने आगळीवेगळी स्पर्धा जाहीर केली आहे. मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने प्रथमच रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २७ ऑगस्टपासून ७ सप्टेंबरपर्यंत चालणार असून, स्पर्धकांना ऑनलाईन नावनोंदणी करून स्वत: तयार केलेली रील अपलोड करावी लागणार आहे.

# कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या घरी गणपतीची प्रतिष्ठापना



दैनिक आपला विदर्भ

**इंदापूर/प्रतिनिधी:** कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या घरी गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. मंत्री भरणे यांच्या हस्ते कुटुंबीयांसमवेत मोठ्या आनंदोत्सवात गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गणपती बाप्पाच्या भोवती शेतातील विविध फळ भाज्या व कडधान्यांची आरास केली आहे. दरम्यान कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यातील शेतकऱ्यांना सुख समृद्धी यश व चांगले दिवस येऊ दे अशी प्रार्थना गणपतीबाप्पालाकेली.

# प्रभासची फिल्मी आई लग्नाआधीच गर्भवती राहिली, गर्भपातासाठी प्रियकराकडून घेतले होते इतके पैसे!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री रम्या कृष्णन तिच्या अभिनयामुळे नेहमीच चर्चेत राहिली आहे. पण तिच्या व्यावसायिक कारकिर्दीसोबतच तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही तिचे नाव नेहमी चर्चेत असते. लग्नाआधीच गर्भवती राहिल्याच्या घटनेमुळे ती एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली होती, ज्यामुळे तिच्या आयुष्यात मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

दिग्दर्शकाशी प्रेमसंबंध आणि गर्भधारणा

रम्या कृष्णनचे २००३ मध्ये लग्न झाले असले तरी, त्यापूर्वी तिचे दाक्षिणात्य चित्रपट दिग्दर्शक के.एस. रविकुमार यांच्यासोबत प्रेमसंबंध होते.

रविकुमार विवाहित होते आणि त्यांच्या दिग्दर्शनाखाली रम्याने अनेक चित्रपटांमध्ये काम केले होते. याच काळात दोघे एकमेकांच्या जवळ आले. काही काळानंतर रम्या गर्भवती राहिल्याचे वृत्त समोर आले, ज्यामुळे मोठी खळबळ उडाली.

गर्भपात आणि पैशांची मागणी

रम्या गर्भवती असल्याची बातमी पसरल्यानंतर, के.एस. रविकुमार यांच्या पत्नीने रम्याला धमकावल्याचे वृत्त त्यावेळी प्रसिद्ध झाले होते.

रवि विवाहित असल्याने ते रम्याच्या मुलाला स्वीकारण्यास तयार नव्हते आणि त्यांना गर्भपात हवा होता. त्यावेळी आलेल्या बातम्यांनुसार, रम्याने गर्भपातासाठी रविकुमार यांच्याकडे ७५ लाख रुपयांची मागणी केली होती, ज्यामुळे हे प्रकरण आणखी चिघळले.

अभिनय कारकीर्द आणि बाहुबलीचे यश

हे सर्व वाद बाजूला ठेवून रम्याने आपल्या अभिनय कारकिर्दीवर लक्ष केंद्रित केले. १९८४ मध्ये सुरुवात केलेली तिची कारकीर्द शेकडो चित्रपटांनी भरलेली आहे.



२०१७ मध्ये आलेल्या बाहुबली चित्रपटातून तिला जगभरात प्रचंड प्रसिद्धी मिळाली. या चित्रपटात तिने प्रभासच्या आईची, शिवगामीची भूमिका साकारली होती.

तिच्या या भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक झाले आणि आजही ती याच नावाने ओळखली जाते. २०१९ मध्ये आलेल्या सुपर डिलक्स चित्रपटातील तिच्या वेश्येच्या भूमिकेनेही मोठी चर्चा घडवून आणली होती.

आपल्या अभिनयामुळे मिळालेल्या यशाच्या तुलनेत तिच्या वैयक्तिक आयुष्यातील वाद काही प्रमाणात मागे पडले असले, तरी आजही तिच्या त्या प्रेमसंबंधांची आणि वादग्रस्त घटनेची चर्चा होत असते.

# शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांचा क्रांतिकारी राजा!

## बुलढाण्यात रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली गणरायाचे जल्लोषात स्वागत; एल्गार मोर्चाच्या देखाव्याने वेधले लक्ष

### ढोल ताशांच्या निनादात क्रांतिकारी राजाचे स्वागत



शेतकरी नेते रविकांत तुपकर स्वत: ढोलाच्या तालावर ठेका धरताना. शेतकरी युवकांचा उत्साह आणि सळसळती उर्जा अनुभवायला मिळाली.

### श्रद्धेची नवी वाटचाल



दत्तक कन्या श्रेया तुपकर हिच्या हस्ते श्रीगणेशाची विधिवत पूजा व मूर्ती स्थापना. पारंपरिक मूल्यांचा आणि सामाजिक भावनेचा संगम.

### शेतकऱ्यांचा आवाज गणरायापर्यंत



''कर्जमाफी दे, भाव दे'' अशी प्रार्थना करतानाचे दृश्य शेतकऱ्यांचे वेदनादायी वास्तव दर्शवणारा क्षण

### एल्गार मोर्चाचा हुबेहूब देखावा



बैलगाडीवर उभे असलेले तुपकर, मागे शेतकऱ्यांचा फौजफाटा शेतकऱ्यांच्या लढ्याचा हुबेहूब देखावा गणेशमूर्तीसमोर साकारलेला.

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** गणेशोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात साजरे होत असतानाच, बुलढाण्यातही आज शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक म्हणून क्रांतिकारी राजा जल्लोषात विराजमान झाला. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर, चिखली रोड, येथे भव्य मिरवणुकीद्वारे गणरायाचे स्वागत करण्यात आले.

मिरवणुकीत ढोल-ताशांचा गजर, डफड्यांचे ठोके, फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची मुक्त उधळण यामुळे संपूर्ण परिसर उत्सवमय झाला होता. रविकांत तुपकर यांनी स्वत: ढोलाच्या तालावर ठेका धरत सहभाग नोंदवला, तर त्यांच्या पत्नी ॲड. शर्वरी तुपकर यांनी रस्त्यावर फुगडी खेळत उपस्थितांचे लक्ष वेधले.

मिरवणुकीनंतर, तुपकर यांची दत्तक कन्या श्रेया हिच्या हस्ते श्रीगणेशाची विधिवत पूजा आणि मूर्तीस्थापना करण्यात आली. धार्मिक विधींमध्ये तुपकर कुटुंबासह अनेक शेतकरी सहभागी झाले.

यावेळी माध्यमांशी बोलताना तुपकर म्हणाले, ''शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर झाले आहेत. अतिवृष्टी, बाजारातील गडबड, आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या वाढत आहेत. अशा वेळी सरकारने शेतकऱ्यांसाठी ठोस निर्णय घ्यावेत. श्रीगणरायाने सरकारला सद्बुद्धी द्यावी, अशी मी प्रार्थना करतो.''

सोहळ्यातील प्रमुख आकर्षण ठरला तो एल्गार मोर्चाचा देखावा. ॲड. शर्वरी तुपकर यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या या देखाव्यात बैलगाडीवर उभे असलेले तुपकर, मागे कष्टकरी शेतकऱ्यांचा फौजफाटा, आणि पोलिस बंदोबस्त अशा दृश्यांची हुबेहूब मांडणी करण्यात आली आहे. हा देखावा गणेशमूर्तीसमोर साकारण्यात आला असून तो पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

बुलढाण्यात पार पडलेला हा उत्सव सामाजिक संदेश देणारा ठरतोय. श्रद्धा, चैतन्य आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीचा आवाज एकत्रितपणे उमटल्याचे चित्र येथे दिसून आले.

**श्रद्धा आणि संघर्षाचा संगम: शेतकऱ्यांच्या गणपतीला जनतेचा सलाम**

बुलढाण्यात पार पडलेला क्रांतिकारी राजाचा उत्सव म्हणजे केवळ गणेशोत्सव नव्हता, तर तो होता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रकाशझोत टाकणारा सामाजिक आंदोलनाचा उत्सव. रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली साजरा झालेल्या या उत्सवाने एक गोष्ट अधोरेखित केली की धर्म, उत्सव आणि समाजहित या परस्परविरोधी संकल्पना नाहीत; उलट त्या एकमेकांना बळ देऊ शकतात.

शेतकऱ्यांच्या जीवनातील अडचणींचा पाढा फक्त भाषणांमध्येच न सांगता, तो गणरायाच्या साक्षीने मांडण्यात आला. एल्गार मोर्चाचा देखावा केवळ सजावट नव्हती, तर ती होती शेतकऱ्यांच्या संघर्षांची साक्ष.

श्रीगणरायाच्या पूजनामध्ये दत्तक कन्येचा सहभाग, महिलांचा उत्साह, तरुणाईचा जोश आणि कष्टकऱ्यांची उपस्थिति या सर्व गोष्टी समाजमनात सकारात्मक बदलाची नांदी ठरू शकतात.

हा सोहळा आपल्याला सांगून जातो की, उत्सव केवळ मनोरंजनासाठी नाही, तर तो जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरू शकतो. श्रीगणराया, अशाच सामाजिक जागृतीच्या प्रेरणा पुढेही लाभोत!

## विविध वृत्त...

### मराठी बिग बॉस विजेता शिव ठाकरेच्या घरी गणरायाचे आगमन





**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी:** सेलिब्रिटीही मोठ्या जल्लोषात गणेशोत्सव साजरा करतात. अमरावतीत बिग बॉस फेम शिव ठाकरेच्या घरी बाप्पाचं मोठ्या जल्लोषात वाजत गाजत आगमन झाले आहे. शिव ठाकरे स्वत: या आनंदात सहभागी झाला, त्याने कंबरेला ढोल बांधत ढोल वाजवण्याचा आनंद घेतला. शिव ठाकरेने वाजत गाजत गणरायाची मूर्ती त्याच्या घरी आणली आहे. शिवच्या घरच्या गणरायाच्या मूर्तीने लक्ष वेधून घेतले आहे.

### रावल गढीवर श्रीमंत राजा गणपतीची मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते स्थापना



**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी:** अनेक दशकांची परंपरा असलेल्या दोंडाईचा येथील रावल गढी वर श्रीमंत राजा गणपतीची स्थापना राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आले. गढी चे राजपुरोहित श्री नगरदेवळेकर यांनी विधिवत पूजन व मंत्रोपचाराने पूजन केले. यावेळी बाजार समितीचे सभापती नारायण पाटील , मुंबई बाजार समितीचे संचालक जिजाबराव सोनवणे, दिवाणजी रूपसिंग गिरासे , भाजपा शहराध्यक्ष जितेंद्र गिरासे, विजय मराठे, निखिल जाधव, संजय मराठे आदी मान्यवर उपस्थित होते.

## गणेश चतुर्थीच्या दिवशीच भामरागडात पुराचे संकट

**गडचिरोली/प्रतिनिधी:** इंद्रावती नदीच्या पाणलोट क्षेत्रात आणि भामरागड लगतच्या छत्तीसगड राज्यातील भागामध्ये कालपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रावती नदीचे पाणीपातळी मध्ये वाढ झाल्याने पर्लकोट नदीला पूर आला आहे. पुराचे पाणी भामरागड शहरात शिरले असून काल रात्रीच भामरागड बाजारपेठेच्या दुकानातील साहित्य प्रशासनाद्वारे आधीच सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. पुरामुळे आलापल्ली-भामरागड राष्ट्रीय महामार्ग बंद झाल्याने गणेश चतुर्थीच्या दिवशीच तालुक्यातील ११२ गावांचा सध्या संपर्क तुटला आहे.

## रिसोड येथे शांतता समितीची सभा



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी:** आगामी सण व उत्सव लक्षात घेता येतील पोलीस स्टेशनमध्ये शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, ह्या होत्या तर प्रमुख उपस्थित त्यामध्ये सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, ठाणेदार रामेश्वर चव्हाण, अभियंता चिंचोले व इतर कार्यालयाचे प्रमुख होते.

आगामी सण व उत्सव शांततेत व सलोख्याने पार पडावे म्हणून काल दिनांक २६ ऑगस्ट रोजी येथील पोलीस स्टेशनच्या प्रांगणात शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी साहेब पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले रिसोड शहर आणि ग्रामीण भागातील समस्यांसाठी या बैठकी करिता तालुका स्तरावरील सर्व विभागाचे अधिकारी सुद्धा बोलविण्यात आले होते. नगर परिषदचे प्रमुख अभियंता, चे प्रमुख अभियंता, पाटबंधारे विभागाचे प्रमुख अभियंता, तसेच कार्यालयाचे प्रतिनिधी, रिसोड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, नॅशनल हायवेचे अधिकारी उपस्थित होते तसेच या बैठकी करिता रिसोड शहर आणि ग्रामीण भागातील शांतता समिती सदस्य/पदाधिकारी, शहरी व ग्रामीण सर्व गणेश मंडळांचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, सर्व पोलीस पाटील, पत्रकार तसेच ईद-ए-मिलाद उत्सव समितीचे पदाधिकारी/सदस्य असे उपस्थित होते. बैठकीमध्ये सर्व कायदेशीर बाबी, डीजे मुक्त उत्सव, सीसीटीव्ही कॅमेरा वर भर, सोशल मीडिया व इतर महत्वाच्या बाबतीत मार्गदर्शन करण्यात ले शांततेत उत्सव पार पाडण्यासाठी पोलिसांनी आवाहन करून सर्वांना पोलीस विभागा तर्फे हिंदू व मुस्लिम बांधवाना उत्सवानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच मागील वर्षी दुर्गा देवी उत्सव मध्ये उत्कृष्ट देखावा आणि नियमांचे पालन केलेल्या ४ मंडळांना शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला.

## खडकी फाट्यावर एसटी बसने मेंढ्यांच्या कळपाला चिरडले; २० मेंढ्या जागीच ठार



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा रस्त्यावरील खडकी फाट्यावर आज सकाळी एसटी महामंडळाच्या बसने रस्ता ओलांडणाऱ्या मेंढ्यांच्या कळपाला धडक दिली. या धडकेत सुमारे २० मेंढ्या जागीच ठार झाल्या असून मेंढपाळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, बुलढाणा येथून मोताळा दिशेने जाणारी एसटी बस खडकी फाट्याजवळ येत असताना समोरून रस्ता ओलांडणाऱ्या मेंढ्यांच्या कळपावर बस चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट कळपावर आदळली. अचानक घडलेल्या या घटनेत अनेक मेंढ्या जागीच चिरडून ठार झाल्या.

घटनेनंतर परिसरातील नागरिक आणि प्रवासी घटनास्थळी जमा झाले. त्यांनी बसचालकाच्या निष्काळजीपणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

मेंढ्यांचा कळप गावातीलच एका मेंढपाळाचा असून तो मेंढ्या चारण्यासाठी जवळच्या शेतामार्गे नेत होता. अपघातामुळे त्याचे मोठे नुकसान झाले आहे. स्थानिक प्रशासन व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

या प्रकारामुळे एसटी महामंडळ व स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षितता उपाययोजनांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर नक्षलवादी-जवानांमध्ये जोरदार चकमक

**गडचिरोली/प्रतिनिधी:** संपूर्ण महाराष्ट्र उत्साहात गणेश चतुर्थी साजरी करत असताना गडचिरोली जिल्ह्यातील महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर कोपरशी परिसरात गडचिरोली पोलिसांचे सी-६० चे जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक सुरू आहे. आज (२७ ऑगस्ट) पहाटेपासून ही चकमक सुरू असून परिसरात जोरदार पाऊसही सुरू आहे. त्यामुळे सी-६० च्या जवानांसमोरील आव्हान वाढले आहे. मात्र विपरीत परिस्थितीतही गडचिरोली पोलीस नक्षलवाद्यांच्या प्रत्येक हल्ल्याला सडेतोड उत्तर देत आहे.

## गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाची रील स्पर्धा

### प्रथम क्रमांकाला एक लाखांचे बक्षीस

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** ांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून यंदा गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळणार आहेत. यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग,महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीने रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन नाव नोंदणी आणि रील अपलोड करायचे आहेत.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणारी ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर,राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होईल. रीलसाठी पर्यावरण संवर्धन,स्वदेशी,गडकिल्ले,संस्कृती,ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील बनविणे अपेक्षित आहे.

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये,द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार,तृतीय पारितोषिक १० हजार,उत्तेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये,द्वितीय पारितोषिक म्हणून ७५ हजार रुपये,तृतीय पारितोषिक म्हणून ५० हजार रुपये,उत्तेजनार्थ



पारितोषिक म्हणून २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस,द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये,तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये,उत्तेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येतील.

स्पर्धेच्या नोंदणीकरिता गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून.या संकेतस्थळावर तसेच महामंडळाच्या सोशल मीडिया हँडल्सवर उपलब्ध आहे,असे दादासाहेब फाळके चित्रनगरीकडून कळविण्यात आले आहे.